गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि-४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित राज्य विद्यापीठ)

आस्थापना विभाग

एम.आय.डी.सी.रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली - ४४२६०५

फोन नंबर ०७१३२-२२३१०४

जावक क्रमांक : गों.वि./आस्था/ २८६३ /२०१६ दिनांक : ७ /१० /२०१६

परिपत्रक

विषय - शासन व्यवहारात देवनागरी लिपीचा वापर

संदर्भ - शासन निर्णय क्रमांक-मभावा- २००४/(प्र.क्र.२५/२००४)/२०ब, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दि. ६ नोव्हेंबर २००९

विद्यापीठाच्या तसेच संलग्नित महाविद्यालयामध्ये शासन निर्णयानुसार मराठी भाषेचा वापर प्रामुख्याने होत असून हस्तलेखन, टंकलेखन, मुद्रण संगणक इत्यादीसाठी सोबत जोडलेल्या तक्त्यात दर्शविणात आलेल्या देवनागरी लिपीतील प्रमाणीकृत मराठी वर्णमालेचा, अक्षरमालेचा व अंकाचा शासनाने स्विकार केला आहे. मराठी भाषेच्या लेखनाला एकरूपता राखण्यासाठी सर्वांनी शासन निर्णयाप्रमाणे सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे व मराठी भाषा समृध्द करण्यास सहकार्य करावे ही विनंती.

डॉ. एस. एम. रोकडे
कुलसचिव(का)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-

१) मा. कुलगुरूंचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीकरीता.
२) मा. प्राचार्य, प्रस्तृत महाविद्यालये,
३) सर्व विभागप्रमुख, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
सदरहु परिपत्रक विभागातील सर्व कर्मचाऱ्यांना निदर्शनास आणुन द्यावे व यानुसार अवलंब करण्यात यावा.

F:\BBDD\LATTER\Circular/154

शासन व्यवहारात देवनागरी लिपी व
वर्णमालेनुसार मराठी हस्तलेखन,टंकलेखन,
मुद्रण, संगणक इत्यादींसाठी स्वीकारलेली
देवनागरी लिपी व वर्णमाला अद्ययावत
करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय, क्रमांक-मभावा-२००४/(प्र.क्र.२५/२००४)/२०ब
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक:- ६ नोव्हेंबर, २००९

वाचा:- १) शासन निर्णय, शिक्षण व समाजकल्याण विभाग, क्र.टीबीके २७६२/जी, दि. २०/७/१९६२.
२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.१०६६/म,दि.२४/९/१९६६.

प्रस्तावना:-

शासन व्यवहारात देवनागरी लिपी व वर्णमालेनुसार मराठी लेखन, टंकलेखन व मुद्रण करण्यासाठी स्वीकारलेली देवनागरी लिपी आणि वर्णमाला याबाबतचे शासन निर्णय वर नमूद केल्याप्रमाणे प्रसृत करण्यात आले होते. या शासन निर्णयानुसार स्वीकारलेली वर्णमाला व जोडाक्षर पध्दती ही मराठी देवनागरी लिपीच्या परंपरेशी व संकेतांशी सुसंगत नव्हती. त्यामुळे मराठी लेखनात गोंधळ निर्माण झाला आहे. मराठी भाषेच्या लिपीच्या व लेखनाच्या संदर्भात वर्तमानपत्रांमधूनही याविषयी वेळोवेळी मतमतांतरे, लेख, पत्रे प्रसिद्ध झालेली आहेत. पाठ्यपुस्तक मंडळाच्या पाठ्यपुस्तकांमध्ये छापल्या जाणा-या जोडाक्षरांबाबतही सातत्याने चर्चा होत असते. मराठी भाषेच्या विकासासाठी कार्यरत असलेल्या संस्थांनी, तसेच काही भाषातज्ञांनी देवनागरी लिपी व वर्णमालेतील त्रुटी तसेच लेखनमुद्रणात एकरुपता नसल्याचे शासनाच्या निदर्शनास आणून दिलेले असून मराठी भाषेसंदर्भात लिपी, वर्णमाला, जोडाक्षरलेखन इत्यादी मूलभूत बाबींवर पुनर्विचार करणे आवश्यक झाले होते.

सध्याच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात सर्वच क्षेत्रांमध्ये संगणकाचा वापर झपाट्याने होत आहे, तसेच यापुढेही अधिकाधिक प्रमाणात होत राहणार आहे. शासनाने सर्व शासकीय कार्यालयांमध्ये संगणकाचा वापर सुरू केलेला असून, शासन व्यवहाराची भाषा मराठी असल्यामुळे संगणकावरही मराठी भाषेतून शासनाचे कामकाज पार पाडणे आवश्यक आहे. मराठी भाषेतून संगणकावर काम करण्यासाठी सध्या अनेक आज्ञावल्या (सॉफ्टवेअर्स) उपलब्ध आहेत. तथापि, त्या सॉफ्टवेअर्समध्ये एकरुपता नाही. इंग्रजी फलकावर केलेली मराठी अक्षरजुळणी प्रत्येक

आज्ञावल्यामध्ये (सॉफ्टवेअर्समध्ये) वेगळी असते. एका सॉफ्टवेअरमधील फाईल दुस-या सॉफ्टवेअरमध्ये उघडत नाही. प्रत्येक व्यक्तीला वेगवेगळे कळफलक आत्मसात करणे किंवा सॉफ्टवेअर विकत घेऊन संग्रही ठेवणे व्यावहारिकदृष्ट्या शक्य होत नाही. त्यामुळे 'वेगाने व विविधांगी काम होणे' हे जे संगणकाचे वैशिष्ट्य आहे, तेच मराठीच्या बाबतीत निष्फळ ठरत आहे. म्हणून देवनागरी लिपीतील मराठी भाषेचा संगणकावरील उपयोग वाढविण्यासाठी सर्व मराठी सॉफ्टवेअर्सच्या कळफलकामध्ये एकरूपता आणणे, त्यांचे प्रमाणीकरण करणे, थोडक्यात प्रमाणीकृत मराठी आज्ञावली (सॉफ्टवेअर) तयार करणे अत्यंत गरजेचे झाले आहे. त्यासाठी वर्णमालेचे व वर्णक्रमाचे प्रमाणीकरण करणे आवश्यक होते.

भारतातील विविध भाषिक राज्यांना माहिती तंत्रज्ञानाचा फायदा मिळावा, देशात त्याचा सर्वत्र प्रसार व्हावा म्हणून केन्द्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने "लॅंग्वेज टेक्नॉलॉजी व्हिजन" हा कार्यक्रम आखलेला आहे. माहिती तंत्रज्ञानाचा प्रसार महाराष्ट्राच्या कानाकोप-यातून होण्यासाठी शासनाने काळाची पावले ओळखून संगणक तंत्रज्ञानाचा मराठी भाषा व संस्कृती इत्यादींच्या विकासासाठी प्रथम मराठी भाषेची लिपी, वर्णमाला, वर्णक्रम इत्यादींचे प्रमाणीकरण करणे गरजेचे होते.

या सर्व बाबी विचारात घेऊन मराठी भाषेच्या विकासासंदर्भात कार्यरत असणा-या विविध सेवाभावी संस्थांनी, नामवंत भाषा तज्ञ, तसेच संगणक तज्ञ यांचेसमवेत चर्चा व सखोल विचार विनिमय करून त्यासंबंधीचा अहवाल शासनास सादर केला होता. मराठी भाषेच्या विकासासाठी विविध सेवाभावी संस्थांनी सादर केलेल्या अहवालानुसार मराठी भाषेची लिपी, वर्णमाला, वर्णक्रम इत्यादी सुधारीत करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय -

सर्व शासकीय कार्यालये, निम-शासकीय कार्यालये, शैक्षणिक संस्था, विद्यापीठे, मंडळे, महामंडळे, प्राधिकरणे, मराठी पाठ्यपुस्तके इत्यादींमध्ये तसेच ज्या ज्या ठिकाणी मराठी भाषेचा वापर होतो अथवा भविष्यात केला जाणार आहे अशा सर्व ठिकाणी हस्तलेखन, टंकलेखन, मुद्रण, संगणक इत्यादींसाठी सोबत जोडलेल्या तक्त्यात दर्शविण्यात आलेल्या देवनागरी लिपीतील प्रमाणीकृत मराठी वर्णमालेचा, अक्षरमालेचा व अंकांचा शासनाने स्वीकार केला आहे. त्या अनुषंगाने वर्णमालेच्या संदर्भातील स्पष्टीकरणे तसेच विशिष्ट अक्षरांच्या लेखनाबाबतच्या सूचना, स्वरचिन्हे,

जोडाक्षरे, वर्णक्रम, लेखनात वापरावयाची विरामचिन्हे व अन्य चिन्हे, अंक, अंकांचे अक्षरी लेखन इत्यादींविषयी सविस्तर व सोदाहरण सूचना देणारी सात परिशिष्टे सोबत जोडली आहेत. मराठी भाषेच्या लेखनात एकरुपता राखण्यासाठी सर्वांनी या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

या संदर्भातील यापूर्वी काढण्यात आलेले सर्व शासन निर्णय/शासन आदेश अधिक्रमित करून हा शासन निर्णय प्रसृत करण्यात येत आहे.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २००९११०६१३०४४७००१ आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने.

(अं. वि. अंभिरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

राज्यपाल यांचे सचिव,
मुख्यमंत्री यांचे सचिव,
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक,
प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई.(पत्राने)
प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई.(पत्राने)
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई(पत्राने)
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
महालेखापाल, महाराष्ट्र -१, मुंबई.
महालेखापाल, महाराष्ट्र -२, नागपूर.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
सर्व मंत्रालयीन विभाग,
संचालक, राज्य मराठी विकास संस्था, एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३ महानगरपालिका मार्ग, धोबीतलाव, मुंबई-४००००१.
अध्यक्ष, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ, औरंगाबाद
संचालक, भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. सर्व मंत्रालयीन विभागाना विनंती करण्यात येते की, सदर आदेश त्यांनी त्यांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख, मंडळे, महामंडळे, प्राधिकरणे तसेच कार्यालय प्रमुखांच्या निदर्शनास आणावेत.

प्रत- निवडनस्तीसाठी / संग्रहासाठी

शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. मभावा-२००४/प्र.क्र.२५/०४, २०-ब,
दि. ६ नोव्हेंबर,२००९ सोबतचे सहपत्र.

महाराष्ट्र शासनाने स्वीकारलेली मराठी वर्णमाला

स्वर

अ	आ	इ	ई	उ
ऊ	ऋ	ऌ	ए	ॲ
ऐ	ओ	ऑ	औ	

स्वरादी

ं (अनुस्वार)	ः (विसर्ग)

व्यंजने

क्	ख्	ग्	घ्	ङ्
च्	छ्	ज्	झ्	ञ्
ट्	ठ्	ड्	ढ्	ण्
त्	थ्	द्	ध्	न्
प्	फ्	ब्	भ्	म्
य्	र्	ल्	व्	
श्	ष्	स्		
ह्	ळ्			

विशेष संयुक्त व्यंजने

क्ष्	ज्ञ्

०	१	२	३	४
५	६	७	८	९

स्वरचिन्हे

मराठी लेखन-मुद्रणासाठी व संगणकीय क्षेत्रासाठी पुढील स्वरचिन्हांचा वापर करावा :

स्वरचिन्हाचे नाव	चिन्ह	चिन्ह ज्या स्वरासाठी / प्रयोजनासाठी वापरावयाचे तो स्वर / प्रयोजन	व्यंजनाचे होणारे रूप
१. **काना**	ा	आ	क् + आ = का
२. **इकार**			
ऱ्हस्व इकार काना व वेलांटी	ि	इ	क् + इ = कि
दीर्घ इकार वेलांटी व काना	ी	ई	क् + ई = की
३. **उकार**			
ऱ्हस्व उकार	ु	उ	क् + उ = कु
दीर्घ उकार	ू	ऊ	क् + ऊ = कू
४. **ऋकार**	ृ	ऋ	क् + ऋ = कृ
५. **ऌकार**	ऌ	ऌ	क् + ऌ = क्ऌ
६. **मात्रा**			
१. एक मात्रा	े	ए (मात्र ए या स्वरावर मात्रा येणार नाही.)	क् + ए = के
२. दोन मात्रा	ै	ऐ (मात्र ऐ या स्वरावर एक मात्रा येते.)	क् + ऐ = कै
३. काना + एक मात्रा	ो	ओ	क् + ओ = को
४. काना + दोन मात्रा	ौ	औ	क् + औ = कौ
७. **अर्धचंद्र**			
१. फक्त अर्धचंद्र	ॅ	ॲ	क् + ॲ = कॅ
२. अर्धचंद्र + काना	ॉ	ऑ	क् + ऑ = कॉ
८. **स्वरादी चिन्हे**			
१. शिरोबिंदू	ं	अक्षरात मिसळलेले अनुनासिक वा अनुस्वार दर्शविण्यासाठी	क् + अ + ं = कं
२. विसर्ग	ः	विसर्गाचा उच्चार दर्शविण्यासाठी	क् + अ + ः = कः
९. **अतिरिक्त चिन्हे**			
हलन्त	्	व्यंजन वर्ण दर्शविण्यासाठी	क् + अ = क
नुक्ता	़	विशिष्ट उच्चार दर्शविण्यासाठी	क् + . + अ = क़
अवग्रह	ऽ	संधीमध्ये लोप पावलेल्या 'अ' दर्शविण्यासाठी /स्वरांचा लांबलेल्या उच्चार दर्शविण्यासाठी	कः + अहम् = कोऽहम् क् + अ ऽ = क ऽ

टीप : 'र' या व्यंजनाला उ कार लावण्याच्या संदर्भात लेखनविषयक विशेष सूचनांमधील सूचना क्र.४ पहावी.

परिशिष्ट एक

१. ॲ आणि ऑ यांचा वर्णमालेमध्ये समावेश

ॲ आणि ऑ हे मराठीत असलेले परंतु इंग्रजी शब्दांमध्ये वैपुल्याने वापरले जाणारे असे दोन स्वरोच्चार आहेत. त्यांचा स्वरांमध्ये समावेश करण्याची आवश्यकता असल्यामुळे वर्णमालेमध्ये, स्वरांमध्ये उच्चारस्थानानुसार ए नंतर ॲ आणि ओ नंतर ऑ चा समावेश करण्यात आलेला आहे.

२. स्वरादी

ं (अं) आणि ः (अः) ही अनुक्रमे शिरोबिंदू (अनुस्वार / अनुनासिक) व विसर्ग यांची चिन्हे आहेत. त्यांचा उच्चार करताना कोणत्या तरी एका स्वराचा उच्चार प्रथम करावा लागतो. म्हणून त्यांना स्वरादी असे म्हणतात. शिरोबिंदू व विसर्ग हे स्वर नसल्यामुळे वर्णमालेमध्ये त्यांचा स्वरादी म्हणून स्वतंत्र निर्देश करण्यात आलेला आहे.

३. ऋ आणि ॠ आणि ऌ, ॡ

ऋ व ऌ या ऱ्हस्व स्वरांचा वर्णमालेमध्ये समावेश करण्यात आलेला आहे. ॠ व ॡ या दीर्घ स्वरांचा वर्णमालेमध्ये समावेश करण्यात आलेला नाही. तथापि, संस्कृत भाषेतील अवतरणे देण्यासाठी, संधी करण्यासाठी तसेच संगणकाच्या ओ.सी.आर. (optical character recogniser) तंत्रज्ञानाच्या दृष्टिकोनातून आवश्यक असल्यामुळे ॠ व ॡ हे दीर्घ स्वर तसेच देवनागरीतील सर्व नवी-जुनी व्यंजनाक्षरे, जोडाक्षरे, त्यांची विविध रूपे, चिन्हे इत्यादी संगणकाच्या स्मृतिकोशामध्ये ठेवण्यात येणार आहेत.

४. वर्णमालेमध्ये आता एकूण १४ स्वर आहेत. हे १४ स्वर आणि २ स्वरादी यांच्या संयोगाने आता प्रत्येक व्यंजनाची १६ अक्षरे तयार होतील. व्यंजन-वर्णाचे अक्षर तयार करण्यासाठी जी विविध स्वरदर्शक चिन्हे व्यंजनांना जोडली जातात त्यांना एकत्रितपणे स्वरचिन्हे असे शीर्षक देण्यात आले आहे.

५. 'क्ष' आणि 'ज्ञ' हे देवनागरी वर्णमालेतील परंपरेने चालत आलेले विशेष लेखन चिन्हाकार आहेत. वास्तवात ती जोडाक्षरेच आहेत. म्हणून या दोन जोडाक्षरांचा वर्णमालेमध्ये ' विशेष संयुक्त व्यंजने' म्हणून निर्देश करण्यात आला आहे.

६. वर्णमालेमध्ये अंक देताना देवनागरीत देण्यात आलेले आहेत.

७. लेखनविषयक विशेष सूचना

१. 'ख' चे लेखन करताना 'ख' असे न करता 'ख' असे खालच्या बाजूने जोडून करावे.
'श' चे लेखन करताना 'श' असे देठयुक्त करावे. 'श' असे गाठयुक्त करू नये.
'ल' चे लेखन करताना 'ल' असे करावे. 'ल' असे दंडयुक्त करू नये.

२. 'च' व 'झ' या व्यंजनांचे दंततालव्य आणि तालव्य उच्चार दर्शवण्यासाठी अधोबिंदू (नुक्ता) देण्याची गरज नाही. तथापि, हिंदी भाषेतील अवतरणात किंवा उर्दू वा सिंधी भाषेतील देवनागरीत अवतरणे देताना नुक्ता वापरावा लागेल. त्यामुळे स्वरचिन्हांच्या तक्त्यामध्ये अतिरिक्त चिन्ह म्हणून नुक्ता दर्शवण्यात आलेला आहे. शब्दकोशामध्ये व इतरत्र स्वतंत्रपणे जर उच्चारभेद कंसात दाखवावयाचे असतील तर अधोबिंदूचा वापर करावा.

३. जोडाक्षरलेखन पारंपरिक पद्धतीने करावे. परिशिष्ट दोनमध्ये जोडाक्षरलेखनाच्या पद्धती दर्शविल्या आहेत.

४. ऱ्हस्व 'रु' आणि दीर्घ 'रू' चे लेखन ऱ्हस्व - दीर्घ उकारचिन्हे खाली न जोडता, म्हणजे अनुक्रमे 'रु' व 'रू' असे न करता, 'रु' व 'रू' असेच करावे.

५. अक्षरांवर शिरोरेखा देणे आवश्यक आहे.

वर्णचिन्हांचा तक्ता

१. वर्णमाला व अक्षरमाला

देवनागरी लिपीतील मराठीतील लेखनचिन्हांच्या तक्त्याला 'वर्णमाला' व 'अक्षरमाला' असे कारणानुसार म्हणावे. स्वर व व्यंजने दोन्ही वर्ण आहेत. स्वर स्वयंपूर्ण असतात. त्यामुळे स्वराचा वर्ण व स्वराचे अक्षर यात फरक असत नाही. व्यंजन हे स्वरावलंबी असते. व्यंजनांमध्ये स्वर मिसळल्यानंतर व्यंजनांचे अक्षर तयार होते. त्यामुळे व्यंजन-वर्ण पाय मोडून दाखवला जातो (उदा. क्) आणि व्यंजन -अक्षर स्वरयुक्त (उदा. क) दाखवले जाते. म्हणून ज्या तक्त्यामध्ये व्यंजने पाय मोडून वर्ण स्वरूपात दर्शविलेली असतील त्या तक्त्याला 'वर्णमाला' म्हणावे आणि ज्या तक्त्यात व्यंजने 'अ' स्वरयुक्त म्हणजे अक्षरस्वरूपात दर्शविलेली असतील त्या तक्त्याला 'अक्षरमाला' म्हणावे.

शालेय प्राथमिक स्तरावर प्रथम अक्षरमालेचा तक्ता शिकवावा. प्राथमिक स्तरानंतर पुढील इयत्तेमध्ये विद्यार्थ्यांना वर्णमालेचा तक्ता शिकवावा. त्यासाठी परिशिष्ट सहा व सात मध्ये दर्शवल्याप्रमाणे दोन स्वतंत्र तक्ते तयार करावेत.

२. वर्णचिन्हांच्या तक्त्यात वर्णक्रम पुढीलप्रमाणे ठेवावा :

स्वर, स्वरादी, व्यंजने, विशेष संयुक्त व्यंजने, अंक.

स्वर :	अ आ इ ई उ ऊ ऋ ऌ ए ॲ ऐ ओ ऑ औ
स्वरादी :	ं (अं) : (अः)
व्यंजने :	क् ख् ग् घ् ङ्
	च् छ् ज् झ् ञ्
	ट् ठ् ड् ढ् ण्
	त् थ् द् ध् न्
	प् फ् ब् भ् म्
	य् र् ल् व्
	श् ष् स्
	ह् ळ्
विशेष संयुक्त व्यंजने :	क्ष् ज्ञ्
अंक :	० १ २ ३ ४ ५ ६ ७ ८ ९

३. कोशामध्ये नोंदी करताना सुरुवातीला अंक व विरामचिन्हे द्यावीत आणि नंतर वरीलप्रमाणे स्वर, स्वरादी, व्यंजने व विशेष संयुक्त व्यंजने असा वर्णक्रम वापरावा.

४. परिशिष्ट चारमध्ये वर्णक्रम उदाहरणे घेऊन स्पष्ट करून दाखविला आहे. सर्वत्र एकरूपता व सुसूत्रता राखण्यासाठी सर्वांनी यापुढील काळात कोश, सूची व तत्सम वाङ्मय तयार करताना या वर्णक्रमाचे पालन करावे.

५. अलीकडच्या काही तक्त्यांमध्ये 'ङ्' आणि 'ञ्' या अनुनासिकांचा समावेश नसतो. तथापि ङ्, ञ्, ण्, न्, म् या पाचही अनुनासिकांचा वर्णचिन्हांच्या तक्त्यामध्ये समावेश असणे आवश्यक आहे.

६. तक्त्यामध्ये अंक देताना देवनागरीत लिहावेत. रोमन लिपीतील जागतिक अंक तक्त्यात देण्याची आवश्यकता नाही.

परिशिष्ट दोन

जोडाक्षरलेखन

ज्या अक्षरात दोन किंवा दोनपेक्षा अधिक व्यंजने एकापाठोपाठ येतात व शेवटी स्वर येतो ते अक्षर जोडाक्षर होय. उदा.

ग् + ण् + अ = ग्ण (रुग्ण)

ख् + ख् + आ = ख्खा (सख्खा)

ख् + र् + इ = ख्रि (ख्रिस्त)

थ् + र् + ई = थ्री

म् + ह + ऐ = म्है (म्हैस)

ब् + ल् + ऑ = ब्लॉ (ब्लॉक)

मराठी भाषेमध्ये वैशिष्ट्यपूर्ण रीतीने जोडाक्षरलेखन केले जाते. दोन किंवा अधिक व्यंजनांचे जोडाक्षर पाहिल्यास ते **एक अक्षर दिसेल** अशा पद्धतीने जोडलेले असते. त्यामुळे जोडाक्षरलेखनातील पहिले महत्त्वाचे तत्त्व हे की जोडाक्षराची जोडणी ही, ते अक्षर पाहताच लक्षात आली पाहिजे आणि दुसरे तत्त्व हे की, उच्चारात ज्या क्रमाने व्यंजने असतील त्या क्रमाने जोडाक्षराचे लेखन व्हायला पाहिजे. पुढे **जोडाक्षरलेखनाच्या** पद्धती दर्शवलेल्या आहेत. त्या पद्धतींनुसार जोडाक्षरलेखन करावे.

मराठी व्यंजनांचे त्यांच्या लेखनाकारानुसार म्हणजे लेखनात दंड (उभी रेषा) कुठे येतो त्यानुसार चार वर्ग होतात.

१. शेवटी दंड असणारी व्यंजने

२. मध्ये दंड असणारी व्यंजने

३. अर्धा दंड असणारी व्यंजने

४. दंड नसलेली व्यंजने

ही व्यंजने जोडाक्षरात प्रारंभी किंवा शेवटी आल्यानंतर जोडाक्षरलेखन कसे होते त्याची सविस्तर माहिती पुढे दिली आहे.

१. शेवटी दंड म्हणजे उभी रेघ असलेली व्यंजने :

अ) स्वतंत्र दंड असणारी व्यंजने : ग् ण् श्

ब) जोडलेला दंड असणारी व्यंजने : ख् घ् च् ज्
झ् त् थ् ध्
न् प् ब्
भ् म् य् व्
ष् स्

ही व्यंजने जोडाक्षरात **आधी आली** की त्यातील दंड काढून जोडाक्षर तयार होते. उदा.

व्यंजन	जोडाक्षरात येणारे रूप	जोडाक्षरे
ख्	ख	सख्खा (ख + खा) ख्यातनाम (ख + या), ख्रिस्त (ख + रि)
ग्	ग	रुग्ण (ग + ण), दिग्दर्शन (ग + द), दग्ध (ग + ध), भग्न (ग + न)
घ्	घ	विघ्न (घ + न), वाघ्या (घ + या), घ्राण (घ + रा)
च्	च	कच्चा (च + चा), परिच्छेद (च + छे), च्यावच्याव (च + या)
ज्	ज	मज्जा (ज + जा), ज्वर (ज + व), ज्या (ज + या)

झ्	झ	माझ्या (झ + या), ओझ्याने (झ + या)
ण्	ण	षण्मास (ण + म), कण्व (ण + व), अरण्य (ण + य)
त्	त	उत्कट (त + क), त्वरित (त + व), वत्स (त + स), उत्तर (त + त), आत्या (त + या), त्रयी (त + र), त्रिताल (त + रि); त + **र चे जोडाक्षर त्र असे होते.**
थ्	थ	तथ्य (थ + य), पथ्य (थ + य), थ्री (इंग्रजीतील तीन या अर्थाचा शब्द थ + री)
ध्	ध	ध्यास (ध + या), ध्रुव (ध + रु), ध्वनी (ध + व)
न्	न	अन्न (न + न), जन्म (न + म), अन्वय (न + व)
प्	प	आप्त (प + त), स्वप्न (प + न), प्याला (प + या), प्रखर (प + र)
ब्	ब	अब्ज (ब + ज), शब्द (ब + द), लुब्ध (ब + ध), ब्याद (ब + या), ब्रश (ब + र), ब्लॉक (ब + लॉ)
भ्	भ	अभ्यास (भ + या), भ्याड (भ + या), अभ्रा (भ + रा)
म्	म	म्यान (म + या), म्लान (म + ला), म्हैस (म + है)
य्	य	हिय्या (य + या), भय्या (य + या), इय्या (य + या)
व्	व	व्यय (व + य), अव्वल (व + व)
ष्	ष	शुष्क (ष + क), कृष्ण (ष + ण), निष्पाप (ष + पा), मनुष्य (ष + य)
स्	स	स्तुती (स + तु), स्थिर (स + थि), स्मरण (स + म), स्वर (स + व)

श - जोडाक्षरात 'श' आधी आल्यास त्याचे दोन प्रकारे लेखन होते.

आधुनिक 'श' हे पूर्णाक्षर पूर्वी 'श्र' या आकृतीने दाखवले जात असे. तथापि, अर्वाचीन काळात 'श्र' ही अक्षराकृती स्वतंत्रपणे नव्हे, तर फक्त जोडाक्षरांतच पूर्वपदी उपयोजिली जाते. त्यामुळे जोडाक्षरात 'श' आधी आल्यास दंड काढून टाकून किंवा वरील अक्षराकृती योजून जोडाक्षरे तयार केली जातात. उदा.

१) अश्म (श + म), मशगूल (श + गू), आवश्यक (श + य)

२) प्रश्न (श + न), पश्चिम (श + चि), श्री (श + री) श्रुती (श + रु), विश्वास (श + वा), श्वान (श + वा)

श् + र चे जोडाक्षर नेहमी 'श्र' असेच करावे. 'र' च्या जोडाक्षरामध्ये याचे स्पष्टीकरण आहे.

२. **मध्यभागी दंड असणारी व्यंजने** : क् फ्

मराठी वर्णचिन्हांमध्ये फक्त क् आणि फ् ही दोन व्यंजने मध्यभागी दंड असलेली आहेत. जोडाक्षरात ही व्यंजने आधी येतात तेव्हा ती **क** आणि **फ** अशी लिहावीत. उदा.

क् - रक्त (क + त), क + त चे जोडाक्षरलेखन विकल्पाने 'क्त' असे करण्यास हरकत नाही. चक्र (क + र) क + र चे जोडाक्षरलेखन विकल्पाने 'क्र' असे करण्यास हरकत नाही. क्लिष्ट (क + लि), पक्व (क + व)

फ् - चाफ्याचे (फ + या), कॉलिफ्लॉवर (फ + लॉ)

३. अर्धा दंड असणारी व्यंजने : छ् ट् ठ् ड् ढ् द् ल् ह् ळ्

अ) १) ळ् हे व्यंजन जोडाक्षरात आधी आल्यास त्यातील दंड काढून टाकावा. उदा.

ळ् - फळ्या, तळ्यात, वाळ्याचा (ळ + य)

२) छ् हे व्यंजन जोडाक्षरात आधी आल्यास त्यातील दंड काढून टाकू नये. उदा.

छ् - उच्छ्वास (उत् +श्वास = उच् +छ्वास = उच्छ्वास

ब) ट् ठ् ड् ढ् आणि ह् ही व्यंजने आधी आल्यास आणि त्यांच्यापुढे 'य' हे व्यंजन आल्यास त्याचे लेखन 'च्य' असे करून जोडाक्षर लिहावे. उदा.

ट् - कोट्यवधी, वाट्याला, पाट्यावर

ठ् - साठ्यात, ताठ्याने

ड् - पगड्या, साड्या

ढ् - वेढ्यामध्ये

ह् - वह्या, वाह्यात, कह्यात

क) 'द्' हे व्यंजन जोडाक्षरात आधी आल्यास आणि त्याच्यापुढे 'य' आल्यास 'द्य' असे लिहावे. उदा.

उद्या, विद्या, उद्यान, द्योतक. 'द्य' चे लेखन या अक्षराकृतीप्रमाणेच करावे. 'दय' किंवा 'द्य' असे करू नये.

जोडाक्षरात द् च्या पुढे 'ग', 'घ', 'ध' किंवा 'व' आल्यास 'द' च्या खालील बाजूस ते अक्षर जोडावे.

बुद्धी, शुद्धलेखन, प्रसिद्धी, पद्धत (द् + ध)

द्वंद्व, द्वितीय, द्विरुक्ती, द्वित्व, द्वीप, द्वापर, द्वेष, विद्वान (द् + व)

अपवाद : मात्र जेव्हा दोन विभिन्न पदांच्या संयोगातून 'द्' चे जोडाक्षर तयार होते तेव्हा, ते 'द' चा पाय मोडूनही लिहिण्याचा विकल्प आहे. उदा : उद् + गार = उद्गार / उद्‌गार

भगवद् + गीता = भगवद्गीता / भगवद्‌गीता

उद् + घाटन = उद्घाटन / उद्‌घाटन

ड) जोडाक्षरामध्ये 'ल' आधी आल्यास त्याचे लेखन 'ल्' असे करावे. उदा.

पाल्य, बाल्य, आल्हाद, उल्हास.

४. दंड नसलेली व्यंजने : मराठी वर्णमालेत दंड नसलेले 'र्' हे एकच व्यंजन आहे. जोडाक्षरामध्ये 'र्' या व्यंजनाचे त्याच्या स्थानानुसार विविध प्रकारे लेखन होते. जेव्हा ते जोडाक्षरामध्ये पूर्णाक्षर म्हणून शेवटी येते तेव्हा त्याचे ्र, ्र आणि ्र असे तीन प्रकारांनी लेखन होते.

१) आधुनिक 'र' हे पूर्णाक्षर पूर्वी ्र या अक्षराकृतीने दाखवले जात असे; तथापि आता ही अक्षराकृती स्वतंत्रपणे नव्हे तर जेव्हा जोडाक्षरात दंडयुक्त व्यंजनांपुढे 'र' हे पूर्णाक्षर म्हणून येते तेव्हा योजली जाते. म्हणून स्वतंत्र दंड असलेली व्यंजने जोडाक्षरात 'र' पूर्वी आली असता त्यांचा दंड काढून त्यांना ही अक्षराकृती जोडून जोडाक्षर तयार करावे.

उदा. ख्रिस्त (ख + ्र + ि), ग्रस्त (ग + ्र), घ्राण (घ + ्र), वज्र (ज + ्र), प्रमाण (प + ्र), ब्र (ब + ्र),

भ्रम (भ + ्र), नम्र (म + ्र), व्रण (व + ्र), स्त्रोत (स + ्र). 'त्' या व्यंजनास ' ्र ' हे अक्षर पुढीलप्रमाणे जोडावे. त् + ्र = त + ्र = त्र (उदा. त्रस्त, कुत्रा, पुत्र, मात्रा इ.)

२) 'क्' आणि 'फ्' या मध्यभागी दंड असणाऱ्या व्यंजनांनंतर 'र' हे पूर्णाक्षर आल्यास मधल्या दंडाला ' ्र ' हे चिन्ह जोडून जोडाक्षर तयार करावे.

उदा. वक्र, क्रियापद, आक्रंदन, आक्रोश, क्रौंच (क्+र) ('क्र' हे जोडाक्षर 'क्र' अशा वैकल्पिक पद्धतीनेही लिहिता येईल.)

फ्रेम, फ्रीज, फ्रॉक (फ् + र)

३) 'द्' या अर्धा दंड असलेल्या व्यंजनांनंतर 'र' हे पूर्णाक्षर आल्यास 'द' च्या खालच्या दंडाला '्र' हे चिन्ह जोडून जोडाक्षर तयार करावे. उदा. द्रव, द्राक्ष, द्रुत, द्रोह

४) छ्, ट्, ठ्, ड्, ढ् या अर्धदंड असणाऱ्या व्यंजनांनंतर 'र' हे पूर्णाक्षर आल्यास त्यांच्याखाली '्र' हे चिन्ह जोडून जोडाक्षर तयार करावे. उदा. कृच्छ्र (च् + छ् + र)

ट्रंक, ट्राम, ट्रेन,राष्ट्र, धृतराष्ट्र (ट् + र)

ड्रम, ड्रिल, टंड्रा (ड् + र)

५) एक स्वर व एक व्यंजन या दोहोंच्या मध्ये 'र्' हे व्यंजन येते तेव्हा, 'र' चा उच्चार मागील स्वराला जोडून केला जात असेल तर, पुढील व्यंजनावर '्' असा रफार देऊन तो दाखवला जावा. (उदा. सूर् + य = सूर्य) आणि त्या 'र्' चा उच्चार पुढील व्यंजनाला जोडून केला जात असेल तर, पुढील व्यंजनाच्या आधी '्' असा रकार जोडून तो दाखवला जावा. (उदा. सु + र् या = सुर्या). रफाराची इतर उदाहरणे : धैर्य, पूर्व, आशीर्वाद, पर्वा, आचार्याने इ. रकाराची इतर उदाहरणे : पर्ह्या, बिर्ह्याड, कुर्ह्याड, आचार्याने इ.

५. **आडवी किंवा उभी जोडणी** : जोडाक्षरामध्ये जेव्हा एकच व्यंजन दोनदा येते तेव्हा या व्यंजनांची जोडणी उभ्या किंवा आडव्या पद्धतीने करतात. जोडाक्षरात एकच व्यंजन दोनदा आल्यास त्याला त्या व्यंजनाचे द्वित्त किंवा द्वित्व झाले असे म्हणतात.

आडवी जोडणी : या जोडणीमध्ये व्यंजने एकापुढे एक जोडून लिहिली जातात. उदा. - सच्चा, उज्जयिनी,सत्ता, विषण्ण, गप्पा, मातब्बर, झिम्मा, हिय्या, रस्सा.

'द्' चे द्वित्त लिहिताना 'द्द' असे लिहावे. ('मुद्दा', 'हुद्दा' या शब्दांमध्ये 'द' चे द्वित्त आहे. यांतील 'द्द' ला 'या' जोडताना 'द्या' असे न लिहिता 'द्द्या' असे लिहिणे आवश्यक आहे.)

उभी जोडणी : या जोडणीमध्ये व्यंजने एकाखाली एक जोडून लिहिली जातात. फक्त क्, ट्, ठ्, ड्, ढ्, द्, ल् या व्यंजनांची जोडणी एकाखाली एक अशी करावी. उदा. - पट्टा, बट्टा, पुठ्ठा, बुड्ढा, खड्डा, मुद्दा, (मार्क) ट्वेन, ट्विन

दोन्ही प्रकारची जोडणी : काही जोडाक्षरे दोन्ही प्रकारे लिहिली जातात. उदा : पक्व /पक्व, पक्का/पक्का, किल्ला / किल्ला, सल्ला / सल्ला, हल्ला /हल्ला, अन्न /अन्न , सुन्न / सुन्न, भिन्न / भिन्न इ.

६. स्त्र हे जोडाक्षर स् + त्र चे आहे. उदा. स्रोत. स्त्र हे जोडाक्षर स् + त + र चे आहे. उदा. शस्त्र, स्त्री.

परिशिष्ट तीन

विरामचिन्हे व इतर चिन्हे

बोलण्यातील विविध भाव व आशय लेखनामध्ये नेमकेपणाने व्यक्त करण्यासाठी जी विविध चिन्हे वापरली जातात ती विरामचिन्हे होय. विरामचिन्हे लिपीला पूरक असतात. सर्वसाधारणपणे लेखनामध्ये वापरली जाणारी विरामचिन्हे व अन्य चिन्हे पुढीलप्रमाणे आहेत :

१) पूर्णविराम	.		
२) प्रश्नचिन्ह	?		
३) उद्गारचिन्ह	!		
४) स्वल्पविराम	,		
५) अर्धविराम	;		
६) अपूर्णविराम किंवा द्विबिंदु चिन्ह	:		
७) संयोग चिन्ह	-		
८) अपसरण चिन्ह	—		
९) लोप चिन्ह	...		
१०) विकल्प चिन्ह	/		
११) दुहेरी अवतरणन्ह चिन्ह	सुरू होणारे अवतरण चिन्ह	‘‘	– बंद होणारे अवतरण चिन्ह – ’’
१२) एकेरी अवतरण चिन्ह	सुरू होणारे अवतरण चिन्ह	‘	– बंद होणारे अवतरण चिन्ह – ’
१३) अधोरेखा	शब्द		
१४) फुल्या	xxx		
१५) काकपद	⌊		
१६) वरीलप्रमाणे	– –"- -		
१७) गोल कंस	( )		
१८) चौकोनी कंस	[ ]		
१९) महिरपी कंस	{ }		
२०) संक्षेपचिन्ह	(.) (०)		
२१) एकेरी दंड	।		
२२) दुहेरी दंड	।।		

एच-१८६१[२५०-११-२००९]-७

परिशिष्ट चार

वर्णक्रम

१.वर्णक्रम स्वर, स्वरादी, व्यंजने आणि शेवटी क्ष / ज्ञ ही विशेष संयुक्त व्यंजने असा ठेवावा.

२.कोश, सूची व तत्सदृश वाङ्मयासाठी आवश्यक त्या नोंदी अकारविल्हे करताना वरील वर्णक्रम वापरावा. कोशामध्ये अकारविल्हे रचना करताना अंक (० ते ९) आणि विरामचिन्हे (, ; इत्यादी) ''अ'' पासून प्रारंभ होणाऱ्या स्वरांच्या आधी घ्यावीत. थोडक्यात प्रथम अंक द्यावेत; त्यानंतर विरामचिन्हे द्यावीत आणि त्यानंतर उपरोक्ताप्रमाणे वर्णक्रम ठेवावा.

'क' या अक्षराने सुरू होणाऱ्या शब्दांच्या उदाहरणाने हा वर्णक्रम येथे स्पष्ट करून दाखवलेला आहे :

स्वर जोडल्यानंतर 'क' या व्यंजनाक्षराचा मुख्य क्रम पुढीलप्रमाणे राहील : क का कि की कु कू कृ क्लृ के कॅ कै को कॉ कौ

क या अक्षरानंतर क्रमाने स्वर असणारे शब्द उदा.

कअ.... ते कऔ .....पर्यंत

उदा. कइ, कई, कऊबऊ..... इत्यादी

त्यानंतर कं ने सुरू होणारे सर्व शब्द. यामध्ये परत कंअ... पासून.... कंज्ञ पर्यंत

उदा. कं कंक, कंगाल, कंचन, कंजर, कंटाळा, कंठ, कंड, कंद, कंस....इत्यादी.

त्यानंतर क: ने सुरू होणारे सर्व शब्द. यामध्ये परत क:अ.... पासून क:ज्ञ....पर्यंत

उदा. क:पदार्थ.....इत्यादी.

त्यानंतर 'क' पुढे क्रमाने सर्व व्यंजने येणारे शब्द कक.... कका... ककौ पर्यंत : अशा प्रकारे क ते ज्ञ पर्यंत प्रत्येक व्यंजन क्रमाने घेणे. यानंतर का, कि, की... असे क्रमाने कौ पर्यंतचे शब्द वर नमूद केलेल्या वर्णक्रमाने घेणे.

कौ पर्यंत सर्व शब्द झाल्यानंतर 'क' ची जोडाक्षरे घेणे.

जोडाक्षरामध्ये अक्षरे ज्या क्रमाने आलेली असतील ती लक्षात घेऊन वरील वर्णक्रमानुसार त्यांचा क्रम लावणे. उदा.

क् + य = क्य / क्या. .....ने सुरू होणारे शब्द

क् + र = क्र / क्रा / क्रि....ने सुरू होणारे शब्द

क् +ल = क्ल / क्ला / क्लि.....ने सुरू होणारे शब्द

क् + व = क्व / क्वि.... ने सुरू होणारे शब्द

संगणकावर वर्णक्रम पाहण्याची पद्धत

३. अक्षर हे एक किंवा अधिक वर्णांचे बनले असल्यामुळे अक्षरांचा क्रम लावताना त्यांची वर्णरचना विचारात घेणे व त्यासाठी वर्णस्तंभाची मांडणी करणे अतिशय आवश्यक असते. मुद्रित मजकुरात (शब्दकोश इ.) अक्षरांचे क्रम पहावयास मिळतात; तथापि संगणकीय संदर्भात शब्दांच्या वर्णरचनेचे उभे स्तंभ तयार करून प्रत्येक स्तंभावारी वर्णक्रम पहावा लागतो.

उदाहरण पहिले - दोन शब्दांचा स्थानक्रम विचार :

१. गोप = ग् +ओ+प्+अ

२. गोपी = ग्+ओ+प्+ई

पहिल्या व दुसऱ्या शब्दातील वर्णरचनेतील पहिले ३ वर्ण एकसारखे असल्याने ४ थ्या स्तंभावर जाऊन जो वर्ण, वर्णक्रमात प्रथम असेल तो शब्द प्रथम यावयास हवा. या उदाहरणात अ हा वर्ण प्रथम येईल व ई हा वर्ण नंतर येईल. त्यामुळे वर्णक्रमानुसार गोपी हा शब्द गोप या शब्दानंतर येईल.

उदाहरण दुसरे - तीन शब्दांचा स्थानक्रम विचार :

कठोर = क्+अ+ठ्+ओ+र्+अ

कंठ =क् + अ + ं +ठ् + अ

काठ = क् +आ +ठ् + अ

या शब्दांचा क्रम लावताना पहिल्या स्तंभातील वर्ण एकसारखे असल्यामुळे दुसऱ्या स्तंभातील वर्णाचा विचार करावा लागेल.

पहिल्या दोन शब्दांच्या वर्णरचनेत दुसऱ्या स्तंभात अ हा वर्ण सारखा आहे व तिसऱ्या शब्दातील दुसऱ्या स्तंभात आ हा वर्ण आहे. आ हा वर्ण अ च्या नंतर येत असल्यामुळे तो शब्द पहिल्या दोन शब्दांच्या नंतरच येणार हे निश्चित झाले. आता पहिल्या दोन शब्दात कोणता क्रम येतो ते पाहू. त्यासाठी तिसऱ्या वर्णस्तंभाकडे पहावे लागेल. वर्णक्रमामध्ये स्वरादिचिन्ह आधी घ्यावयाचे असल्यामुळे दुसऱ्या शब्दातील स्वरादिचिन्ह, अनुस्वार हे ठ् वर्णाच्या आधी येईल व दुसऱ्या शब्दाला (कंठ) पहिला स्थानक्रम द्यावा लागेल. त्यामुळे शब्दांचा स्थानक्रम पुढीलप्रमाणे राहील.

१. कंठ

२. कठोर

३. काठ

उदाहरण तिसरे - जोडाक्षरयुक्त शब्दातील स्थानक्रमाचा विचार :

१. क्रम = क् + र् + अ + म् + अ

२. किंचित = क् + इ + ं + च् + इ + त् + अ

३. क्वचित = क् + व् + अ् + च् + इ + त् + अ

या तिन्ही शब्दांच्या वर्णरचनेतील पहिल्या वर्णस्तंभात क् हा वर्ण असल्याने दुसऱ्या स्तंभातच तिन्ही शब्दांचे स्थानक्रम अनुक्रमे 'किंचित', 'क्रम', 'क्वचित' असा निश्चित झाल्याने तिसऱ्या स्तंभात जाण्याची आवश्यकता नाही. पण समजा दुसऱ्या स्तंभातही एकच वर्ण आला असता तर मात्र पुढच्या (तिसऱ्या) स्तंभाकडे जावे लागेल असते.

उदाहरण चौथे - समान जोडाक्षर असलेल्या तीन शब्दांचा स्थानक्रम विचार :

१. भ्रमनिरास = भ् + र् + अ + म् + अ + न् + इ + र् + आ + स् + अ

२. भ्रमित = भ् + र् + अ + म् + इ + त् + अ

३. भ्रमन्ती = भ् + र् + अ + म् + अ + न् + त् + ई

या शब्दांमध्ये पहिले चार स्तंभ सारख्याच वर्णाचे असल्यामुळे पाचव्या स्तंभातील वर्ण विचारात घ्यावे लागतील. ५ व्या स्तंभातील इ हा वर्ण अ च्या नंतर येत असल्यामुळे भ्रमित हा शब्द तिसऱ्या स्थानक्रमावर येणार हे निश्चित झाले. आता राहिलेल्या दोन शब्दांमध्ये पहिला - दुसरा क्रम लावण्यासाठी ६ व्या स्तंभाचा वर्णक्रम विचारात घ्यावा लागेल. ६ व्या स्तंभामध्ये न् हा सारखाच वर्ण आहे. त्यामुळे ७ व्या स्तंभातील वर्ण विचारात घ्यावा लागेल. इ हा वर्ण त् या वर्णाच्या आधी येत असल्यामुळे भ्रमनिरास हा शब्द आधी येईल आणि भ्रमन्ती हा शब्द त्यानंतर येईल. त्यामुळे शब्दांचा स्थानक्रम पुढीलप्रमाणे राहील :

१. भ्रमनिरास

२. भ्रमन्ती

३. भ्रमित

तथापि, याठिकाणी एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी की ''भ्रमन्ती'' हा शब्द परसवर्णाचा वापर न करता अनुस्वार देऊन ''भ्रमंती'' असा लिहिला तर या शब्दांचा वर्णक्रम बदलेल.

भ्रमनिरास = भ् + र् + अ + म् + अ + न् + इ + र् + आ + स् + अ

भ्रमंती = भ् + र् + अ + म् + अ् + ं + त् + ई

वर्णक्रमामध्ये स्वरादिचिन्ह व्यंजनाच्या आधी येत असल्यामुळे वर्णक्रम पुढीलप्रमाणे राहील :

भ्रमंती

भ्रमनिरास

भ्रमित

परिशिष्ट पाच

देवनागरी अंक आणि त्यांचे प्रमाणीकृत अक्षरी लेखन

०	शून्य	२८	अठ्ठावीस	५६	छप्पन्न	८४	चौऱ्याऐंशी
१	एक	२९	एकोणतीस	५७	सत्तावन्न	८५	पंच्याऐंशी
२	दोन	३०	तीस	५८	अठ्ठावन्न	८६	शाऐंशी
३	तीन	३१	एकतीस	५९	एकोणसाठ	८७	सत्याऐंशी
४	चार	३२	बत्तीस	६०	साठ	८८	अठ्ठ्याऐंशी
५	पाच	३३	तेहतीस	६१	एकसष्ट	८९	एकोणनव्वद
६	सहा	३४	चौतीस	६२	बासष्ट	९०	नव्वद
७	सात	३५	पस्तीस	६३	त्रेसष्ट	९१	एक्याण्णव
८	आठ	३६	छत्तीस	६४	चौसष्ट	९२	ब्याण्णव
९	नऊ	३७	सदतीस	६५	पासष्ट	९३	त्र्याण्णव
१०	दहा	३८	अडतीस	६६	सहासष्ट	९४	चौऱ्याण्णव
११	अकरा	३९	एकोणचाळीस	६७	सदुसष्ट	९५	पंचाण्णव
१२	बारा	४०	चाळीस	६८	अडुसष्ट	९६	शहाण्णव
१३	तेरा	४१	एकेचाळीस	६९	एकोणसत्तर	९७	सत्याण्णव
१४	चौदा	४२	बेचाळीस	७०	सत्तर	९८	अठ्ठ्याण्णव
१५	पंधरा	४३	त्रेचाळीस	७१	एकाहत्तर	९९	नव्याण्णव
१६	सोळा	४४	चव्वेचाळीस	७२	बाहत्तर	१००	शंभर
१७	सतरा	४५	पंचेचाळीस	७३	त्र्याहत्तर	१०००	हजार
१८	अठरा	४६	शेहेचाळीस	७४	चौऱ्याहत्तर	१,००,०००	लाख
१९	एकोणीस	४७	सत्तेचाळीस	७५	पंचाहत्तर	१०,००,०००	दहा लाख
२०	वीस	४८	अठ्ठेचाळीस	७६	शाहत्तर	१,००,००,०००	कोटी
२१	एकवीस	४९	एकोणपन्नास	७७	सत्त्याहत्तर	१०,००,००,०००	दहा कोटी
२२	बावीस	५०	पन्नास	७८	अठ्ठ्याहत्तर	१,००,००,००,०००	अब्ज
२३	तेवीस	५१	एकावन्न	७९	एकोणऐंशी		
२४	चोवीस	५२	बावन्न	८०	ऐंशी		
२५	पंचवीस	५३	त्रेपन्न	८१	एक्याऐंशी		
२६	सव्वीस	५४	चौपन्न	८२	ब्याऐंशी		
२७	सत्तावीस	५५	पंचावन्न	८३	त्र्याऐंशी		

परिशिष्ट सहा
मराठी वर्णमाला तक्ता
सर्वसाधारण वापरासाठी

स्वर

अ	आ	इ	ई	उ
ऊ	ऋ	ऌ	ए	ॲ
ऐ	ओ	ऑ	औ	

स्वरादी

ं (अनुस्वार)	ः (विसर्ग)

व्यंजने

क्	ख्	ग्	घ्	ङ्
च्	छ्	ज्	झ्	ञ्
ट्	ठ्	ड्	ढ्	ण्
त्	थ्	द्	ध्	न्
प्	फ्	ब्	भ्	म्
य्	र्	ल्	व्	
श्	ष्	स्		
ह्	ळ्			

विशेष संयुक्त व्यंजने

क्ष्	ज्ञ्

अंक

०	१	२	३	४
५	६	७	८	९

परिशिष्ट सात
मराठी अक्षरमाला तक्ता
शालेय स्तरासाठी
स्वर व स्वरचिन्हे

अ	आ (ा)	इ (ि)	ई (ी)	उ (ु)
ऊ (ू)	ऋ (ृ)	ऌ (ॢ)	ए (े)	ॲ (ॅ)
ऐ (ै)	ओ (ो)	ऑ (ॉ)	औ (ौ)	

स्वरादी

ं (अनुस्वार)	ः (विसर्ग)

व्यंजन - अक्षरे

क	ख	ग	घ	ङ
च	छ	ज	झ	ञ
ट	ठ	ड	ढ	ण
त	थ	द	ध	न
प	फ	ब	भ	म
य	र	ल	व	
श	ष	स		
ह	ळ			

विशेष संयुक्त व्यंजने

क्ष	ज्ञ

अंक

०	१	२	३	४
५	६	७	८	९